Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 435 – 438
DOI: 10.5281/zenodo.10131365
Original Research Article

# म. गांधीजींच्या सत्याग्रहाची ओळख

डॉ. खलील नबीसाब सय्यद

सहयोगी प्राध्यापक तथा विभागप्रमुख, तत्त्वज्ञान विभाग, पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी जि. लातूर ४१३५१९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sayyedkhalil42@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

## परिचय

महात्मा गांधी हे भारतात 20 व्या शतकात होऊन गेलेले एक भव्यदिव्य व्यक्तिमत्त्व होते. भारतातील कोट्यवधी लोकांना अलीकडील काळात होऊन गेलेल्या मोठ्या विचारवंताची, नेत्यांची, तत्त्ववेत्यांची, धर्मगुरुंची, संन्यासी-योग्यांची व उद्योगपतींची नावे माहीत नसतील पण सर्वांना महात्मा गांधी हे नाव अत्यंत सुपरिचित व जवळचे वाटते.

## प्रस्तावना

महात्मा गांधी सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्न सोडविण्यात आणि अन्याय-अत्याचार, जुलूम, शोषण व दडपणूक यांचा अहिंसेच्या मार्गाने प्रतिकार करण्यामध्ये तज्ञ होते. केवळ आदर्श विचार किंवा कार्यक्रम मांडून ते समाधान मानत नसत वा स्वस्थ बसत नसत, तर मांडलेला आदर्श प्रत्यक्षामध्ये आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असत. त्यामुळे त्यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये असताना वंशवादाविरुद्ध दीर्घकाळ लढा दिला. भारतामधील जुलमी ब्रिटिश सत्ता घालविण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. ब्रिटिश सत्ताधीश अर्ज-विनंती मार्गाला जुमानणार नाहीत, हे त्यांनी नेमकेपणाने ओळखले होते. तो मार्ग त्यांना उपयुक्तही वाटत नव्हता. म्हणून ते दिनेश वांच्छा यांना लिहिलेल्या एका पत्रात लिहितात, “I think the growing generation will not be satisfied with petitions. We must give them something effective.” त्यांना चळवळीसाठी अर्ज-विनंतीपेक्षा दुसरे एखादे शस्त्र हवे होते. ते त्यांनी सत्याग्रहाच्या रुपाने भारतीयांना व जगाला दिले.

सत्याग्रहाच्या रुपाने म.गांधीनी एकीकडे युध्दाला व हिंसाचाराला पर्याय दिला तर दुसरीकडे भारतातीलच नव्हे तर संपूण्र जगातील शोषित, पीडित, परतंत्र, दु:खी व दुर्बल माणसाच्या हातात अन्यायाच्या विरोधात लढण्याचे धारदार व लखलखीत शस्त्र दिले. सत्याग्रहामुळे पाशवी शक्तीचे बळ कमी होते आणि सामान्यांचे अन्यायाच्या विरोधात लढण्याचे बळ वाढते. सत्याग्रहात वैयक्तिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समस्या सोडविण्याची सुप्त शक्ती असते. सत्याग्रहाद्वारे कोणत्याही प्रकारचे मतभेद व तंटे मिटविता येतात. म्हणून म.गांधीनी सत्याग्रह म्हणजे समस्या किंवा प्रश्न सोडविण्याची गुरुकिल्ली आहे. “कारागिर अलिकडे एक प्रकारची किल्ली बनवितात ती सर्व प्रकारच्या कुलपांना चालते. ते तिला ‘मास्टरकी’ म्हणतात. तसेच ‘सत्याग्रह’ ही आपल्या अगणित आपत्तीवरील गुरुकिल्ली आहे’, असे गांधीजी म्हणतात.”

**सत्याग्रहाचा अर्थ**

सत्याग्रह ही महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानातील एक प्रमुख व महत्त्वाची संकल्पना आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानामध्ये सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या संकल्पना परस्पर निगडित व अविभाज्य संकल्पना आहेत. त्यांनी सत्य व अहिंसा या दोन तत्त्वांच्या आधारे सत्याग्रह संकल्पनेचा विकास केलेला आहे.

अनत्याचारी असहकार, सविनय कायदेभंग, हरताळ, बहिष्कार, धरणे, घेराव घालणे, काम बंद करणे, काम करु देणे अशक्य करणे, निषेध नोंदवणे, जाहीर सभा व मिरवणुकी काढून अन्यायाची लोकांना जाणीव करुन देणे, करबंदी करणे आणि शेवटी उपोषण करणे असे लढ्याचे अनेक प्रकार हळूहळू तयार होत गेले. मात्र या सर्वात एक मुख्य अट अशी होती की, प्रतिपक्षावर हिंसक हल्ले करायचे नाहीत, त्यांच्या शरीराला हात लावायचा नाही, त्यांच्यावर काठ्या, शस्त्रे किंवा कोणतीही हिंसक साधने वापरायची नाहीत, त्यांना अपशब्द वापरायचे नाहीत, शिवीगाळ करून असभ्य भाषा वापरायची नाही, त्यांची बदनामी करावयाची नाही व प्रतिपक्षासंबंधी मनात द्वेषभावना ठेवावयाची नाही. प्रतिपक्षाने धरपकड केल्यास अटक करण्याचा प्रतिबंध करावयाचा नाही व न्यायालयात आपले म्हणणे, आपले मागणे खणखणीतपणे मांडून न्यायाची मागणी करावयाची व दिलेली तुरुंगवासाची शिक्षा शांतपणे सहन करावयाची व शेवटपर्यंत प्रतिपक्षाचे मतपरिवर्तन किंवा हृदयपरिवर्तन करण्यासाठी प्रयत्न करावयाचे, निर्भयतेने सर्व छळ सोसावयाचे, स्वाभिमान न गमविता व माणुसकीची पातळी न सुटू देता प्रतिपक्षाशी व्यवहार करावयाचे. मात्र पराभव पत्करावयाचा नाही, शरणागती पत्करायची नाही, माफी मागायची नाही. गरज पडल्यास प्राणांची बाजी लावावयाची व आपल्याला वाटणाऱ्या सत्याचा विजय होईपर्यंत चिकाटीने, धीराने व निर्भयपणाने आपल्या निश्चयाला व कार्याला चिकटून राहावयाचे. कारण हा सत्यासाठी धरलेला आग्रह असतो, म्हणजे सत्याग्रह असतो. सत्याग्रह धरणारा किंवा कृती करणारा सत्याग्रही असतो. ‘सत्याग्रह’ हा शब्द ‘सत्य’ आणि ‘आग्रह’ या दोन शब्दांपासून बनलेला आहे. म्हणून सत्याग्रहाचा शब्दशः अर्थ सत्याचा आग्रह असा आहे. म. गांधीजींनी ‘सत्याला चिटकून राहणे म्हणजे सत्याग्रह’ अशी सत्याग्रहाची व्याख्या केली आहे. ते लिहितात, “Satyagraha is relentless search for truth and determination of truth.” याचा अर्थ सत्याचा शोध घेणे आणि सत्यापर्यंत पोहचणे, हे सत्याग्रहमाध्ये अभिप्रेत आहे.

सत्याग्रह म्हणजे स्वतः क्लेश करून सत्याचे संरक्षण करणे होय. यासंदर्भात ते म्हणतात, “Satyagraha and its offshoots, non-cooperation and civil resistance, are nothing but new names for law of suffering.” आत्मक्लेश हा सत्याग्रहाचा आत्मा आहे. म्हणून सत्याग्रह करणे ही साधी गोष्ट नाही. सत्याग्रह हा काही विनोद नाही. त्यासाठी ध्येयवादावर प्रखर निष्ठा असावी लागते. सत्याग्रह हा मानवाचा धर्म आहे. सत्याग्रह हा सत्याचा कायदा असतो. त्यात प्रेमाचा अविष्कार झालेला असतो. यात हिंसेला यत्किंचितही स्थान नसते. सत्याग्रहामध्ये प्रतिकार हा निश्चितपणे असतो, पण हा प्रतिकार अन्यायाचा असतो, अन्याय करणाऱ्या व्यक्तीचा नसतो.

प्रसिद्ध पाश्चात्त्य विचारवंतर थॉमस हक्सले यांनी खऱ्या प्रगतीचे तत्त्व स्पष्ट केलेले आहे. ते म्हणतात, “जीवन दोषांमुळे जगण्याला असमर्थ ठरलेल्यांना जगण्यासाठी समर्थ व संपन्न बनविणे यातच तुमच्या जीवनाची सार्थकता आहे.” “Fitting the unfit to survive” हेच खऱ्या प्रगतीचे तत्त्व आहे. म.गांधीजी या तत्वालाच सत्याग्रह म्हणतात.

**सत्याग्रहाची तत्वे:**

म.गांधीजींनी सत्याग्रहाची काही तत्वे सांगितलेली आहे. सत्याग्रह हा न्याय व खरेपणावर आधारला पाहिजे. म्हणून त्याचा वापर केवळ न्यायय कारणासाठीच (Just cause) केला पाहिजे. सत्याग्रह आत्मबळावर केला पाहिजे. सत्याग्रहात हिंसा टाळली पाहिजे पण लढणे मात्र टाळता कामा नये. याउलट यात धैर्य, धीर, प्रेम व नीतीने सतत लढणे अभिप्रेत असते. सत्याग्रहात शिस्तीला महत्त्व असते. सत्याग्रहींनी त्यांच्या नेत्यांनी दिलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. सत्याग्रहात निष्क्रियतेला नव्हे तर सक्रियतेला महत्व असते. सत्याग्रह नेहमी नव्हे, प्रसंगानुरुप करावा. सत्याग्रहाला पराजय माहीत नसतो. सत्याग्रहातून जे मिळविले जाते ते सत्याग्रहाद्वारेच टिकविले पाहिजे. त्यांच्या मते, कोणताही सत्याग्रह या तत्त्वाचे पालन करून केला पाहिजे तरच तो यशस्वी होतो.

**सत्याग्रहाचे स्वरूप**

एखाद्या शास्त्रज्ञाने निरीक्षण, प्रयोग, सिद्धांतकल्पना आणि पडताळणीकरण या शास्त्रीय प्रक्रियेतून एखादा शोध लावावा तसा म.गांधीजींनी सत्याग्रहाचा शोध लावला. त्यांच्या मते सत्याग्रह सतत विकसित होणारे प्रगतीशील तत्त्व आहे. ते सामाजिक परिवर्तनाचे व जीवनाचा मार्ग म्हणून अजून आकार घेत आहे. त्यांनी या संकल्पनेला नवीन आयाम व आशय देण्याचे मौलिक कार्य केले आहे.

कोणताही सत्याग्रह करताना प्रथमतः अन्यायाचे संकलन केले पाहिजे. त्यानंतर ज्यांनी अन्याय केला त्या पक्षाशी चर्चा करावी. चर्चा व इतर मार्ग संपल्यावरच स्वशुद्धी करून प्रत्यक्ष कृती म्हणजे सत्याग्रह करावा असे ते म्हणतात. त्यांच्या मते, सत्याग्रह हे दुबळयाचे नव्हे तर संयमी, हिंमतवान, शौर्यवान आणि निर्भय व्यक्तीचे प्रतिकाराचे शस्त्र आहे. कोणतीही भ्याड व्यक्ती सत्याग्रह करु शकत नाही. शरीराने कृश असलेली पण मनाने अत्यंत खंबीर असलेली सामान्यातील सामान्य व्यक्तीदेखील जगातील कोणत्याही बलाढ्य शक्ती व व्यवस्थेच्या विरोधात सत्याग्रह करु शकते. सत्याग्रहात संख्येला महत्त्व नसते. त्यांच्या मते, सत्य आणि असत्य यात विवेक करणारी व अहिंसेचे काटेकोर पालन करणारी केवळ एक स्त्री व पुरुष देखील कोणताही सत्याग्रह यशस्वी करु शकतो.

**समारोप**

वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, सत्याग्रह ही महात्मा गांधींनी केवळ भारतीयांनाच नव्हे तर संपूर्ण मानवजातीला दिलेली एक महत्त्वाची व अनमोल देणगी आहे. सत्याग्रहाच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आणता येतात. म्हणून सामाजिक परिवर्तनास आवश्यक असलेली संघशक्ती निर्माण करता येते. लोकांना जनआंदोलनात सहभागी करून घेता येते. याद्वारे सर्वसामान्य लोकांमध्ये अन्यायासंबंधी व त्यांच्या खऱ्या समस्यांसंबंधी ज्ञान व जाणिवा वाढतात. यामुळे ते अन्यायाच्या विरोधात लढण्यास तयार होतात. सत्याग्रह फक्त नकारात्मक नव्हे तर सकारात्मक संकल्पना आहे. सत्याग्रह हे लोकांचे सहकार्य मिळविण्याचे प्रभावी माध्यम आहे.

**संदर्भ**

१. T.M.P. Mahadevan and C.V. Saroja, “Contemporary Indian Philosophy”, Madra, 1985
२. Benay Gopal Ray, “Contemporary Indian Philosophy”, Allahabad, 1957
३. हेमचंद्र धर्माधिकारी, “सामाजिक तत्त्वज्ञानाची मूलत्त्वे”, जवाहर मुद्रणालय, देगलूर
४. डॉ.नागोराव कुंभार, “सत्याग्रह - म.गांधीजींचा दृष्टिकोन”, आर्टि ग्राफिक्स, लातूर, 2007